जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १८१ दिनांक - २१/०३/२०२५**

अंमली पदार्थ विरोधी पथक १ गुन्हे शाखा पुणे शहर

## भांगयुक्त बंटा गोळयांची विक्री करणा-यास जेरबंद,

पुणे शहरामध्ये भांगयुक्त बंटा गोळयांची विक्री होत असले बाबत माहिती मिळाली होती. त्याअनुषंगाने अंमली पदार्थ विरोधी पथक १ गुन्हे शाखा पुणे शहर कडील पोलीस अधिकारी व पोलीस अंलदार असे मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये पेट्रोलिंग करीत असताना साई सृष्टी रेसिडेन्सी समोर देशमुखवाडी, कॅनोलरोड,शिवणे पुणे या ठिकाणी सार्वजनीक रोड लगत इसम नामे **दिनेश मोहनलाल चौधरी वय ३० वर्षे,रा.राधा कृष्ण, अर्पाटमेंन्ट,देशमुखवाडी, शिवणे पुणे** याचे ताब्यात **१०,८००/-रु किमतीचे पांढ-या नायलॉन पोत्यामध्ये भांगयुक्त बंटयाच्या गोळया असलेले एकुण २४ पॅकेट प्रत्येकी पाकीटाचे वजन २०० ग्रॅम असा एकुण ४ किलो ८०० ग्रॅम वजनाचा** प्रोव्हिबीशनचा ऐवज अवैधरित्या विक्री करीता जवळ बाळगताना मिळुन आल्याने त्याचे विरुध्द उत्तमनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.सदरचा इसम हा मुळचा राजस्थान राज्यातील असुन पुणे शहरामध्ये गेले पाच वर्षा पासुन किरणा मालाचे दुकाण चालवित आहे. त्याने सदरच्या भांगयुक्त बंटा गोळया कोठुन आणल्या व कोठे विक्री करीत होता याबाबत पोलीस अधिक तपास करीत आहेत.

वरील नमुद कारवाई ही मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे शाखा श्री.शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री.निखील पिंगळे, मा.सहा पो आयुक्त,गुन्हे १ श्री.गणेश इंगळे यांचे मार्गदर्शना खाली अंमली पदार्थ विरोधी पथक,१ गुन्हे शाखा पुणे शहर कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक उल्हास कदम, सहा पोलीस निरीक्षक अनिकेत पोटे, पोलीस उप निरीक्षक दिगंबर कोकाटे, पोलीस अंमलदार, सचिन माळवे, संदिप शिर्के, विपुन गायकवाड, विशाल दळवी, मारुती पारधी, संदेश काकडे, दत्ताराम जाधव, योगेश मोहिते यांनी केली आहे.


विजयावटी
आयुर्वेदिक औषधि
GMP
नकल से सावधान फोटो है असली की पहचान